ललिता गंडभीर
Lalita Gandbhir.
4200 North Ocean Drive.
1501-2
Riviera Beach, FL. 33504.
U. S. A.

# काका मला क्षमा करा

प्रत्येक उन्हाळ्याच्या सुट्टीत मुंबईच्या आमच्या नातेवाईकांच्या गोतावळ्याला भेट देण्याची आमची पद्धत होती. आई व मी असेच एका वर्षी जायला निघालो होतो तेव्हा आईला बाबांनी, “अवीकडे जायला विसरू नकोस” म्हणून सांगताना मी ऐकलं आणि मनातल्या नातेवाईकांच्या घरातल्या यादीत अवीच्या घराची नोंद केली.

आईला व मला अवीचं नवं घर शोधायला थोडा वेळ लागला. परिणामी आम्ही अवीकडे पोचलो तेव्हा संध्याकाळ झाली होती. अवीच्या घरी बाहेरच्या उठाबसायच्या खोलीत बरीच माणसं जमून आरती करत होती. फ्लॅटच्या उघड्या दरवाजातून आम्ही आत गेलो व चपला काढून आरतीत सामील झालो.

मी गर्दीवरून नजर फिरवली. कोपऱ्यातल्या देव्हाऱ्यासमोर उभं राहून एक मध्यमवयीन, सोवळेधारी,इतर असंख्य काकांसारखे दिसणारे काका आरती म्हणत होते. त्यांच्या शेजारी उभं राहून एक लहान,साधारण माझ्याएवढाच मुलगा छोटी नक्षीदार झांज वाजवत होता. त्याच्या हातातील झांज काढून घेण्याचं ठरवून मी गर्दीतून पुढे घुसायला लागले.

त्या मुलाशेजारी पोचून त्याच्या हातातली झांज कशी काढून घ्यावी ह्याचा मी एकाग्रपणे विचार करत होते तोच माझ्या लक्षात आलं,तबकवाले काका घुमत,डोलत आहेत. मी त्यांच्याकडे टक लावून बघू लागले. हळूहळू त्यांचं डुलणं वाढलं. त्यांच्यामागे उभे असणारे एक दुसरे काका पुढे सरकले. त्यांनी डुलणाऱ्या काकांच्या हातातलं तबक घेतलं. अकस्मात डुलणाऱ्या काकांनी एक डरकाळी फोडली. मी गर्दीला धक्के मारत आईकडे धाव घेतली.

काकांच्या डरकाळ्यांना आता उड्यांची साथ मिळाली. मी सोडून ह्या उड्याडरकाळ्यांचा कुणावर परिणाम झालेला दिसला नाही. आरती चालूच राहिली.

आरती संपताच आईने मला प्लॅटबाहेर खेचलं. कारण एव्हाना माझी भीती पूर्णपणे गेली होती. तोंड दाबून मी हसणं आवरायचा प्रयत्न करत होते.

आई म्हणाली, “हे बघ सुमे,तू वेडेवाकडे प्रश्न विचारायच्या आधीच सांगते. त्या सदूकाकांच्या अंगात देव येतो.”

मी म्हटलं, “देवाची एकही मूर्ती मला हललेली दिसली नाही.”

आई म्हणाली, “त्या नुसत्या मूर्ती आहेत. देव एकाच वेळी अनेक ठिकाणी जाऊ शकतो.”

मी म्हटलं, “हो का? मग देव आरतीच्या वेळी आपल्या घरी बाबांच्या किंवा आजोबांच्या अंगात कां येत नाही?”

हा वाद चालू असताना उड्या मारणाऱ्या काकांकडून तबक घेणारे काका व झांजवाला मुलगा बाहेर आले. ते काका म्हणाले, “ही सुमी वाटतं? बरीच मोठी आणि बापासारखी वाद घालणारी झालेली दिसतेय. हे बघ सुमे, देव अंगात यायला देवावर खूप श्रद्धा लागते.”

मी म्हटलं, “वा! म्हणजे माझ्या आजीआजोबांची देवावर श्रद्धा नाही वाटतं?”

कुणीतरी घरातून ओरडलं ‘प्रसाद’ आणि आम्ही घरात गेलो.

तिथे एका कोपऱ्यात सदुकाका घुमत उभे होते. सगळेजण त्यांना नमस्कार करत होते. मी गर्दीत बेपत्ता व्हायचा प्रयत्न केला पण आईने बखोट धरून नमस्कार करायला लावलाच.

प्रसादानंतर गर्दी पांगली. झांज वाजवणाऱ्या मुलाने स्वतःची ओळख करून दिली. “मी नरु. तुझं नाव काय?”

मी म्हटलं, “सुमी, सुमित्रा.” मग घुमणाऱ्या काकांकडे बोट दाखवून विचारलं, “ते कोण?”

नरु म्हणाला, “ते सदूकाका. माझ्या बाबांचे मोठ्ठे भाऊ. माझ्या बाबांचं नाव अवी. माझे बाबा आणि तुझे बाबा लहानपणापासूनचे मित्र आहेत.”

चहापोहे चालले असताना मी सदूकाकांना विसरले. आम्ही जायला निघालो तेव्हा मात्र सदूकाकांकडे मी पाहून घेतलं.

देव्हाऱ्याशेजारी भिंतीला डोकं टेकून मांडी घालून ते बसले होते. त्यांच्या बाकदार नाकाच्या नाकपुड्या धाप लागल्यासारख्या दर श्वासागणिक फुलत होत्या,पिंगट डोळे आकाशात काही तरी तारवटून पहात होते आणि अर्धे पिकलेले केस व धोतर अस्ताव्यस्त झालं होतं. विलग पातळ ओठातून जीभ बाहेर आलेली होती.

मी त्यांच्याकडे आ वासून बघत असताना नरु म्हणाला, “देव सदूकाकांना आता सोडून जातोय. देव त्यांच्या अंगातून जाताना ते असेच दिसतात.”

पुण्याच्या स्टेशनवर बाबा भेटताक्षणीच मी सांगून टाकले, “बाबा, बाबा आम्ही अवीकाकांकडे गेलो होतो ना तेव्हा सदूकाकांच्या अंगात देव आला. तुमच्या अंगात कां हो देव येत नाही?”

बाबा हताशपणे म्हणाले, “थोडक्यात अवीचे भोग संपलेले दिसत नाहीत.”

घरी पोचताच मी आजीला गाठून सदूकाका पुराण लावलं आजी म्हणाली, “सदूच्या अंगी देव येतो ही परमेश्वराची कृपाच हो. सदूला आता देवासारखाच मानायचा.”

बाबा एकदम भडकले. ते आजीला म्हणाले, “ह्या खुळेपणाला तू देवाची कृपा म्हणतेस? ह्या सदूमुळे अवीच्या आणि त्याच्या आईवडिलांच्या आयुष्याचा सत्यनाश झालाय. लहानपणापासून सद्याच्या अंगात पुढारी,नट,क्रिकेटियर,गायक असले कोणकोण येऊन गेले.

आता देव येतोय. धड शिक्षण घेतलं नाही. साधी प्यूनची नोकरी त्याला टिकवता आली नाही. अवीने सद्या सुधारेल या आशेने तामिळनाडूला बदली घेतली पण सद्या होता तसाच राहिलेला दिसतोय. त्याची सोंग चालूच आहेत.”

आजी म्हणाली, “सदूच्या अंगात देव येतो आणि तू त्याला सोंग म्हणतोस! हे बघ, सदूचं मोठेपण तुझ्यासारख्या संसारी माणसाला कळणार नाही.”

बाबा म्हणाले, “आता मी पण नोकरी सोडून देव अंगी आल्याचं सोंग घेतो म्हणजे लोक मला देव मानायला लागतील.”

आजी म्हणाली, “हे बघ हा मोठेपणा मूळचाच अंगी असावा लागतो. तुझ्या बापासारखीच तुझी देवावर श्रद्धा नाही. तुला हे सगळं थोतांडच वाटणार.”

बाबा म्हणाले, “अवीसाठी वाईट वाटतंय म्हणून मी बोलतोय. अवी जन्मल्यापासून त्याच्या आईवडिलांचं लक्ष सद्यावरच केंद्रित झालं होतं. सारखे सद्याला सुधारण्याच्या मागे होते. आता अवीच्या आईवडीलांचं वय झालं तेव्हा बिचारा अवीच सद्याला सांभाळतोय. रोज रात्री पन्नास माणसं आरतीला येतात म्हणे! घर आहे की धर्मशाळा!”

नंतर मला शोध लागला की माझ्या आजीआजोबांचं आणि अवीकाकांच्या आईवडीलांच कुटुंब मुंबईला चाळीत शेजारी रहात असे. त्यांचा खूप घरोबा होता. अवीकाका व बाबा लहानपणाचे जिवश्चकंठश्च मित्र होते. सदूकाकाचं मात्र कधीच ठीक नव्हतं. शाळेत ते सारखे नापास व्हायचे. ते मोठे झाल्यावर त्यांनी अनेक सोंग केली. आपण मोठा धंदेवाईक,गायक, पुढारी,नट,क्रिकेटियर आहोत अशा वेगवेगळ्या समजुती करून घेऊन ते तसेच वागू लागायचे. त्यांच्यावर अतोनात पैसाही खर्च झाला. बरीच वर्ष तामिळनाडूला राहून ही मंडळी हल्लीच मुंबईला परतली होती. आमच्या नातेवाईकांच्या मुंबईहून येणाऱ्या पत्रात आता सतत सदूकाकांबद्दल बातम्या येऊ लागल्या. त्या एकाच धर्तीच्या असत.

“सदूकाकांना श्रीसत्यनारायण दिसला होता. त्याने ‘आम्ही सत्यनारायणाची पूजा करावी’ असा निरोप सदूकाकांना दिला.”

“सदूकाकांना कोल्हापूरच्या अंबाबाईने ‘सुरेखावाहिनींना आपली खणानारळाने ओटी भर’ म्हणून कळवलं.”

एक दिवस आजीलाच सदूकाकांचं पत्र आलं. “दीड दिवसाचा गणपती पाच दिवसांचा कर” हा निरोप सदूकाकांतर्फे गणपतीनेच तिला पाठवला होता.

मुंबईहून अशी पत्रं आली की बाबांचा आणि आजीचा खटका उडायचा पण ह्या गणपतीच्या निरोपानंतर बाबा भडकलेच, “त्या सद्याच्या नादी तू लागू नकोस. पाच दिवसांच्या गणपतीने केवढं काम वाढेल.”

आजी म्हणाली, “माझ्या जीवात जीव असे पर्यंत मी पाच दिवसाचा गणपती करणार. मी मेल्यावर तुम्ही हवं ते करा.”

नंतर आणखी एक प्रकार सुरु झाला. वेगवेगळे,अनेक ठिकाणचे देव सदूकाकांना आपल्या देवळांना भेट देण्याची आमंत्रण देऊ लागले. सदूकाका दहा दहा मैल चालून देवळांना

भेटी देऊ लागले. रात्र झाली तर वाटेतल्या कुठल्याही ओळखींच्या अथवा नातेवाईकांच्या घरी रहायला जाऊ लागले.

परिणामी आजी व बाबांचे वाद चालत. त्या धर्तीचे वाद आमच्या ओळखीच्या सर्वांच्या घरी सुरु झाले.

हळूहळू सदूकाका देवांच्या देव्हाऱ्यातल्या मूर्ती,तबक,निरंजन उचलून नेतात अशा तक्रारीही ऐकू येऊ लागल्या.

बाबा म्हणाले, “हा सद्या आता चोऱ्या करायला लागला.”

आजी म्हणाली, “सद्या ह्या जगाचा नाही. भूतभविष्य त्याला माहिती नाही. आपले नियम त्याला लागू नाहीत. देव त्याला त्यावेळी जे सुचवेल ते तो करतो.”

बाबा म्हणाले, “हो. मात्र देवांच्या सूचनेचा भुर्दंड अवी भरतो.”

आजी म्हणाली, “तुला असलं हे काही समजणार नाही.”

बाबा म्हणाले, “तुला समजणार नाही ह्यावर औषध नाही.”

मग बातमी आली की सदूकाका आता दिवसरात्र झोपून असतात.

आजी म्हणाली, “देवाला सदूची काळजी आहे. देव त्याला विश्रांती घ्यायला लावतो.”

बाबा म्हणाले, “अगदी लहानपणापासून तो असाच मधूनमधून झोपतो. म्हणजे तसं आपण म्हणायचं. खरं म्हणजे तो निष्क्रिय होतो. अंतराळात डोळे लावून बसतो.”

त्यानंतर मी मेडिकलला गेले. माझ्या मुंबईच्या वाऱ्या कमी झाल्या. सदूकाका प्रकरण चालूच होतं.

डॉक्टर होऊन मी अमेरिकेत सायकॅट्री रेसिडन्सीसाठी आले आणि पहिल्या सहा महिन्यातच माझ्या डोक्यात प्रकाश पडला. मी ताबडतोब बाबांना एक पत्र लिहिलं. “सदूकाकांना मॅनिक डिप्रेसिव्ह हा मानसिक आजार आहे. हा आजार झालेले पेशंट मॅनिक फेजमध्ये स्वतःला कुणी मोठं  समजतात किंवा मोठे धंदे,प्रचंड खरेदी असे उद्योग करतात. डिप्रेसिव्ह फेजमध्ये निष्क्रिय होतात. ह्या आजारावर औषधं आहेत.”

बाबांनी लगेच अवीकाकांना कळवलं. अवीकाकांनी भारतातच एका सायकॅट्रीस्टचा सल्ला घेतला व सुरवातीच्या ट्रिटमेंटसाठी सदूकाकांना अमेरिकेत आणण्याचा निर्णय घेतला.

मला धसकाच बसला. ‘माझ्या छोट्याश्या अपार्टमेंटमधे आरती करत सदूकाका टणाटण उड्या मारत आहेत. अपार्टमेंटच्या लाकडी फ्लोअरला भगदाड पडून आम्ही तळघरात कोसळलो आहोत’ अशा प्रकारची स्वप्नं मला पडली.

प्रत्यक्षात सदूकाका आले ते झोपाळू परिस्थितीत होते. त्यांना सायकॅट्रीस्टला दाखवून औषध सुरु करताच ते उठून बसले. सामान्य माणसासारखे वागू लागले. आरती करताना त्यांच्या अंगात देव संचारेनासा झाला. अवीकाकांना हर्षवायूच झाला. त्यांनी माझे अनेकदा आभार मानले. ते मुंबईला परतल्यावर “तुझं फार कौतुक होतंय. सर्व नातेवाईक तुझी स्तुती करत आहेत” अशी बाबांची पत्र आली.

मध्ये एकदा मी मुंबईला जाऊन आले तेव्हा सदूकाका व्यवस्थित होते. मी भेटले तेव्हा त्यांनी औषधाबद्दल थोडी कुरकूर केली. माझ्या आजीला हा सदूकाकातला फरक पसंत पडलेला दिसला नाही. पण ती मला नीटशी भेटलीच नाही. त्यामुळे तिच्याशी सदूकाकांबद्दल बोलणं झालं नाही. नरु आता सर्जन होऊन मुंबईलाच प्रॅक्टिस करत होता. तो व त्याचे आजोबा सदूकाकांच्या औषधांची व्यवस्था करत असत.

मी अमेरिकेला परतल्यावर वर्षभरातच सदूकाकांचे वडील गेल्याचं समजलं. नंतर दोन-तीन वर्षांनी अवीकाकांना हार्ट ॲटॅक आल्याचं कळलं. त्यानंतर बाबांनी अकस्मात सदूकाकांबद्दल लिहिणं बंद केलं. मी परत परत विचारूनही त्यांनी काही लिहिलं नाही.

मला शेवटी कुणा एका तिऱ्हाईताकडूनच कळलं की सदूकाकांना वेड्याच्या हॉस्पिटलात टाकलंय.

त्यानंतर मी मुंबईला भेट द्यायला गेले ती सदूकाकांचं काय बिघडलं ह्याचा शोध लावण्याचा निश्चय करूनच गेले.

मुंबईच्या नातेवाईकांपैकी कुणीच काही सांगेना. अवीकाका व त्यांच्या बायकोने माझं प्रेमाने स्वागत केलं. अवीकाका व सदूकाकांच्या आई मात्र माझ्याशी एक शब्दही बोलल्या नाहीत. अवीकाकांकडून कळलं की नरु ठाण्याला रहायला गेला. मी नरूला भेटायला गेले.

नरु व त्याची बायको मला बघून खूष झालेले दिसले. नरुने मला सदूकाकांची हकीकत सांगितली.

“अमेरिकेहून बाबा व सदूकाका परतल्यावर आमच्या घरी प्रथमच आम्हाला शांतता लाभली. माझ्या आजीला सदूकाकांच्या अंगात देव येईना म्हणून राग आला पण आजोबा सायकॅट्रीस्टच्या मदतीने सदूकाकांना औषध देत राहिले. पुढे आजोबा गेले तेव्हा बाबा ते काम करू लागले. नंतर बाबांना हार्ट अटॅक आला. ते व आई माझ्याकडे रहायला आले. त्यावेळी सदूकाका व आजी घरात एकटे राहिले. सदूकाकांनी त्यांचं औषध घेणं बंद केलं. आजीला तर ते औषध हे विषच आहे असं वाटत असे. तिने सदूकाकांना औषध बंद करण्यास प्रोत्साहनच दिलं असणार. थोड्या दिवसातच सदूकाका बेपत्ता झाले. मला वाटलं,गेले असतील कुठल्यातरी देवळात. मी त्यांचा शोध करण्याचा थोडाफार प्रयत्न केला पण ते सापडले नाहीत. साधारण एका महिन्याने सदूकाकांचा एक फोटो वर्तमानपत्रात छापून आला. पोलिसांनी त्यांना पकडून तुरुंगात टाकलं होतं. मी पोलिसांना व देवळ्यातल्या पुढाऱ्यांना भेटलो. त्यांनी जी हकीकत सांगितली त्यावरून काका घरून पळाल्यावर काय घडलं असेल याचा मी अंदाज केला. घरातून पळून गेल्यावर काका एका देवळात बैराग्यासारखे राहू लागले. लोकांना मी देवाचा अवतार आहे असं सांगू लागले. काही लोकांचा त्यांच्यावर विश्वासही बसला. मग काका लोकांना मी तुमच्या इच्छा पुऱ्या करतो अशी आश्वासनं देऊ लागले. लोक त्यांना आपल्या इच्छा सांगू लागले. त्यांच्या आशीर्वादाने दोघंजण परीक्षा पास झाले,एकाला नोकरी लागली असंही घडलं. शेवटी एक बाई त्यांच्याकडे आपल्या छोट्या मुलीला घेऊन मुलगा होऊ दे असा आशीर्वाद मागायला गेली तेव्हा ‘तुझ्या मुलीला माझ्या पायाशी बळी दे,मग तुला मुलगा होईल’ असं

काका म्हणाले. ती बाई घाबरली. तिने तिच्या नवऱ्याला सांगितलं. त्याने पोलिसांना कळवलं. पोलिसांनी काकांना पकडलं तेव्हा सदूकाकांचा मॅनिया अगदी शिगेला पोचला होता. चार पोलिसांना ते आवरेनात. पोलिसांनी त्यांना तुरुंगात टाकलं तेव्हा 'तुरुंग भस्म करीन' अशी त्यांनी धमकी दिली. वर्तमानपत्रांना ह्या घटनांचा सुगावा लागला. काकांचे बेड्या घातलेले फोटो वर्तमानपत्रात छापून आले. ते सर्वांनीच पाहिलं. आधीच काकांबद्दल लोकांचं मत चांगलं नव्हतं. आता तर नातेवाईक नाही नाही ते बोलू लागले. आमची अतिशय बदनामी झाली. आजी आणि बाबांना फार वाईट वाटलं."

मी म्हटलं, "वाढत्या वयाबरोबर हा आजार वाढत जातो."

नरु म्हणाला, "मी सदूकाकांच्या आजाराचे दाखले जज्जला दाखवले. जज्जने सदूकाका हे 'वेड्याच्या हॉस्पिटलात यापुढे कायमचे राहतील' अशी कबुली करून घेतल्यावरच सदूकाकांना तुरुंगातून सोडलं."

मी डोळे पुसत म्हटलं, "ह्या सर्वाला जवाबदार मी आहे. ट्रिटमेंट सुरु होण्यापूर्वी काकांनी कधीच कुणाला इजा केली नव्हती. ट्रिटमेंट दिली नसती तर पूर्वीसारखेच काका वागत राहिले असते. परिस्थिती या थराला गेली नसती."

नरु म्हणाला, "सुमे, काकांना ट्रिटमेंट देण्याचा निर्णय आमचा होता. बाबा माझ्याकडे आले तेव्हा सदूकाकांची औषधं सुरु ठेवण्याचं काम माझं होतं. आजी व काका औषधाविरुद्ध होते हे मला माहिती होतं. दोष माझाच आहे. शिवाय तुला खरं सांगू, काका वेड्याच्या हॉस्पिटलात आहेत हे चांगलच आहे. बाबांना आजी,काका आणि त्यांची औषधं सांभाळणं आता कठीण आहे."

नरुने स्वतःला दोष लावून घेतला खरा पण पुण्याला मला आजीला तोंड द्यावं लागलं. मी पुण्याला पोचताच आजी कडाललली, "तू,नरु,अवी आणि तुझा बाबा स्वतःला फार शहाणे समजता...... देवस्थानी असणाऱ्या माणसाला तुम्ही औषध म्हणून विष दिलंत. सदूच्या अंगातल्या देवाला तुम्ही घालवलं आणि सदूच्या अंगात सैतान संचारला. तुम्ही औषध देईपर्यंत सदूने कधी स्वतःला देव म्हटलं नव्हतं. किडा मुंगीलाही इजा न करणारा सदू निष्पाप अर्भकाला माझ्या पायी बळी दे असं म्हणणारच नाही. हे त्याच्या अंगातला सैतान बोलत होता. सुमे,जगात मानाने जगणाऱ्या सदूला तुम्ही वेड्याच्या इस्पितळात रहाण्याची सजा दिलीत. त्या कोंडवाड्यात तो बिचारा तडफडत असेल. तू आता एक कर. सदूकाकांना भेटून त्यांची क्षमा माग."

स्वयंपाकघरातून डोळे पुसत मी बाहेरच्या खोलीत आले. बाबा तिथे बसले होते. ते म्हणाले, "सुमे, तुझ्या आजीचं बोलणं तू मनावर घेऊ नकोस. अवीच्या नशिबी सुख नाही हेच खरं! सदूचं औषध बंद झाल्याने त्याला वेडाचा झटका आला हे तुझ्या आजीला कधीच पटणार नाही."

बाबा हे सगळं बोलले हे खरे पण त्यांच्या बोलण्यात ते पूर्वी आजीशी वाद घालत, तेव्हा सारखा जोम नव्हता.

वेड्याच्या हॉस्पिटलच्या आवारात मी शिरले तेव्हा त्या बिल्डींगच्या गजाच्या खिडक्या आणि बंद दरवाजे पाहून माझ्या मनातली अपराधी भावना बळावली. हॉस्पिटलच्या जवळ जाताच एका अस्वच्छ दुर्गंधीने मला घेरलं.

काका फक्त एक लोखंडी पलंग असलेल्या खोलीत थंड फरशीवरच भिंतीला डोकं टेकून बसले होते. त्यांचे डोळे आसमंतात कुठेतरी लागले होते. धाप लागल्यासारखा त्यांचा श्वास चालला होता. नाकपुड्या प्रत्येक श्वासागणिक फुलत होत्या. मी हाक मारली ‘काका’.

काकांनी माझ्याकडे पाहिलंही नाही. मी परत प्रयत्न केला, “सदूकाका, मी सुमा. ओळखलं का?” काकांकडून मुळीच प्रतिसाद आला नाही. शेवटी मी म्हटलं, “काका मला क्षमा करा.”

त्यांच्याकडे बघत मी तशीच थोडा वेळ उभी राहिले,परतण्यासाठी दोन पावलं गेल्यावर मी वळून काकांकडे दृष्टीक्षेप केला तेव्हा माझ्या लक्षात आलं,देव काकांना सोडून चालला होता.

पूर्व प्रसिद्धी : एकता, एप्रिल १९९७.